# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक १४/११/२०१९ रोजी (का.प.क्र.०५) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक १४/११/२०१९ रोजी (का.प.क्र.०५) मा.सभापती श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३५ वाजता वंदेमातरम् या गीताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त (महसूल), श्रीमती मंजुषा मुथा, नगर सचिव, श्री.डि.डि.सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| ०१. | स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ०२. | स.स.श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| ०३. | स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ०४. | स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर |
| ०५. | स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद |
| ०६. | स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ०७. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| ०८. | स.स.श्रीमती सिमा कहानुलाल चक्रनारायण |
| ०९. | स.स.श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| १०. | स.स.श्री.नासेर तकिउद्दीन सिद्दीकी |

<u>चर्चा :</u>

श्री.गजानन बारवाल : शहरामध्ये डेंग्युचा प्रश्न निर्माण झालेला आहे. यामध्ये महानगरपालिका आरोग्य विभाग पाहीजे तसे काम करत नाही. शहरामध्ये डेंग्युची वाढती स्थिती अतिशय धोकादायक आहे. आरोग्य विभागाला याबाबत योग्य नियोजन करण्या बाबत सुचना करण्यात यावी.

श्री.अब्दुल म.नविद : घाटी रुग्णालयात डेंग्युच्या पेशंटसाठी बेड खाली नाही अशी परिस्थिती तिथे निर्माण झाली. आरोग्य विभागाकडुन जे फवारणीचे काम केले जाते, ते काम दिसुन येत नाही. वार्डातील एका बारा वर्षाच्या मुलाची डेंग्युने मृत्यु झाली. याची जबाबदारी कूणावर असणार आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः डेंग्यु विषयी वार्डातील नागरीकांना याची माहिती दिली पाहिजे. कारण नागरीकांना वाटते कि डेंग्यु हा कचऱ्यामुळे होतो परंतु असे नाही, डेंग्यु डास स्वच्छ पाण्यामध्ये निर्माण होतो. महापालिकेतर्फे काय काय उपाय योजना करत आहोत याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : याबाबत संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य अधिकारी(श्रीमती राणे): सध्या डेंग्युची जी परिस्थिती आहे त्यावर आरोग्य विभागातर्फे स्थायी वृत्तमान पत्रातुन जाहीर निवेदन जुन, जुलै आणि सप्टेंबर महिन्यात जाहीर निवेदन दिलेले आहे. ऑक्टोंबर महिन्यात कोरडा दिवस पाळावा म्हणुन निवेदन दिले होते. डेंग्युच्या आळ्या पाणी साठवुन ठेवल्याने निर्माण होतात. ऑगस्ट महिन्यात एमसीएन रेडिओवर डेंग्युबाबत माहिती दिली. प्रतिबंधात्मक उपाय योजना राबवता याव्या म्हणुन आयएमई ला पण दोनवेळा पत्र दिलेले आहे.

मा.सभापती : याबाबत दखल काय घेतली जाते? ते प्रशासनाने सांगावे

आरोग्य अधिकारी(श्रीमती राणे): कर्मचाऱ्यांमार्फत आरोग्य केंद्रांना डेंग्युच्या प्रकरणे कळवतो. त्या भागामध्ये जाऊन कर्मचाऱ्यांमार्फत फवारणी केली जाते आणि सर्व्हे सुध्दा केला जातो.

मा.सभापती : जनजागृतीसाठी काय उपाय करणार आहेत?

आरोग्य अधिकारी (श्रीमती राणे): आठ तारखेपासुन डेंग्यु बाबत ॲडोटाइजमंन्ट करत आहोत. नागरिकांमध्ये जाऊन शिबीर घेऊन याबाबत प्रशिक्षण देणार आहोत. वार्डामध्ये ज्या कचऱ्याच्या घंटा गाड्या आहेत त्यावर माहिती देऊन जनजागृती करणार आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: डेंग्यु कशामुळे होतो आणि त्याचे लक्षणे काय आहे? याचे स्टिकर्स सर्व वार्डामध्ये लावण्यात यावे.

श्री.अब्दुल म.नविद : ज्या लोकांचे डेंग्यूमुळे मृत्यु झाले त्याकरिता काय करणार आहोत? त्यांना मदत दयावी.

मा.सभापती : डेंग्यूमुळे जे लोक दगावले आहेत त्यांच्याकरिता काय करणार आहोत. खूलासा करावा.

आरोग्य अधिकारी(श्रीमती राणे): ज्या भागामध्ये डेंग्यूमुळे मृत्यु झाले होते त्या भागामध्ये सर्व्हे आणि शिबिर घेतले आहेत. उपाय योजना राबवित आहेत.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: मुख्य लेखापरीक्षण यांचा लेखा परीक्षण अहवाल खुप महत्वाचा असतो. लेखापरीक्षण पथकाने मागणी केलेले सर्वच अभिलेख या विभागाने उपलब्ध करुन दिलेली नाही. उपलब्ध अभिलेख्यानुसार झालेले लेखापरीक्षण चाचणी स्वरुपात करण्यात आलेले आहे. याचा अर्थ काय, ते सांगण्यात यावे.

मुख्य लेखा परीक्षक : लेखा परिक्षणासाठी विभाग प्रमुखांकडे पुर्ण लेख्यांची मागणी करु आणि त्यांच्याकडुन जेवढे लेखी प्राप्त झाले त्याचे लेखा परीक्षण करु. पुर्ण १०० टक्के व्हावचरची तपासणी होऊ शकत नाही. कारण या विभागात कर्मचारी संख्या आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: लेखा परीक्षक विभागाने प्रत्येक प्रकरणामध्ये त्यांनी त्यांचा अभिप्राय दिलेला आहे की, संबंधीत अधिकाऱ्यावर जबाबदारी देऊन निश्चित करुन महापालिकेचे जे नुकसान झालेले आहे ते नुकसान भरपाई करण्यात यावी. पण असे एकाही प्रकरणामध्ये झालेले नाही.

मा.सभापती : याबाबतीत काय करणार आहोत? माहीती दयावी.

मुख्य लेखा परीक्षक : मा.आयुक्तांकडुन याबाबत कार्यवाही अपेक्षित आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: या संदर्भामध्ये पत्र दिलेले आहे. विषयः महानगरपालिकेतील वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सन २०१४-१५ व सन २०१५-१६, तसेच सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०६(३) अन्वये मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर केलेल्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेदाचे पुर्तता करुन घेणे व अपूर्ण राहिलेले लेखा परीक्षण पूर्ण करण्याचा आदेश देणे बाबत.

औरंगाबाद महानगरपालिकेतील वार्षिक लेखा परीक्षण अहवाल कायद्यातील तरतुदीनुसार मुख्य लेखा परीक्षक यांनी प्रत्येक वर्षी नियमितपणे स्थायी समितीस सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परीक्षक यांनी वरील ४ वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल दोन संचामध्ये सादर केलेला आहे. पहिल्या अहवालात नगररचना विभागातील बांधकाम परवाने,भोगवटा प्रमाणपत्र,भुसंपादन इ.पैकी बांधकाम परवान्याच्या ९८४ व भोगवटा प्रमाणपत्राच्या ५५ संचिकांचे लेखा परीक्षण केले. यामध्ये एकुण ७४ बांधकाम परवानगी प्रकरणी व भोगवटा प्रमाणपत्रातील ०८ असे एकूण ८२ प्रकरणात अनियमितता व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे परिच्छेद सादर केले आहे. या अहवालातील गंभीर बाब म्हणजे परिच्छेद क्र.१ मध्ये नगररचना विभागाने कोणकोणत्या बाबतीत अभिलेख उपलब्ध करुन दिला नाही. या बाबत तक्त्यामध्ये अनु.१ ते २१ नुसार कोणता अभिलेख अप्राप्त आहे ते कळविले आहे व याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे असेही कळविले आहे. ८२ चाचणी प्रकरणात दिलेला अहवाल अत्यंत गंभीर स्वरुपाचा असुन सदरील अहवालाच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान तात्काळ भरुन घेणे व दोषी अधिकाऱ्यांवर खाते चौकशीची कार्यवाही सुरु करुन जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

लेखा परीक्षण विभागाने आर्थिक वर्ष सन २०१६-१७ व सन २०१७-१८ यामध्ये अपुर्ण अभिलेखाचे लेखा परीक्षण केले असल्याचे दिसुन येते. नगररचना विभागाने लेखा परीक्षणासाठी अभिलेख उपलब्ध करुन दिला नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. या विभागाचे संपुर्ण सखोल लेखा परीक्षण केल्यास कोट्यावधी रुपयांची अनियमितता,आर्थिक घोटाळे व अधिकाऱ्याचे हितसंबंध उघडकीस येतील. परंतु प्रशासनाकडुन सर्व बाबी दडवण्यात येतात व भ्रष्ट्राचारी अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यात येत आहे. सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या कालावधीत नगररचना विभगाने लेखा परीक्षण विभागास लेखा परीक्षण पथकाने मागणी केलेले अभिलेख उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्यामुळे उपलब्ध अभिलेखानुसार झालेले लेखा परीक्षण चाचणी स्वरुपात करण्यात आलेले आहे. व त्या दरम्यान नगररचना विभागास लेखा परीक्षणांतर्गत एकुण १६ परिच्छेद समाविष्ट करण्यात आले आहेत. दोन आर्थिक वर्षात नगररचना सारख्या विभागाच्या कारभारात केवळ १६ प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता आढळुन आली या विभागातील वरील कालावधीतील संपूर्ण प्रकरणांची सखोल चौकशी केल्यास नरगरचना विभागातील अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेस किती कोटींचे आर्थिक नुकसान पोहचवले व अनियमित बांधकाम परवानग्या,भोगवटा प्रमाणपत्र,रेखांकन प्रकरणे समुह गृहनिर्माण योजना प्रकल्प व व्यापारी संकुले यांना भ्रष्ट्राचार करुन परवानग्या दिल्या हे उघड होईल. केवळ १५ टक्के इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते उर्वरीत ८५ टक्के इमारतीमध्ये झालेल्या अनियमितता,वाढीव बांधकाम इ. मुळे लाखो रुपयांचा दंड लागु शकतो. व महानगरपालिकेस महसुल मिळु शकतो या बाबत संबंधित बिल्डर व नगररचनाचे अधिकारी मिळुन परस्पर प्रकरणे दडवतात.यावर कुणाचेही नियंत्रण नाही.

वरील चारही वर्षाचे लेखा परीक्षण अहवालामध्ये टीडीआर सारख्या महत्वाच्या विषयाचे लेखा परीक्षण करण्यात आलेले नाही. एकुण २०० प्रकरणामध्ये टीडीआर प्रमाणपत्र देण्यात आले आहे. परंतु लेखा परीक्षण विभागाने एकाही टीडीआर प्रकरणात लेखा परीक्षण केले नाही हे विशेष होय. नगररचना विभागातील भ्रष्ट्राचार व अनागोंदी कारभार याचे दर्शन वार्षिक लेखा परीक्षण अहवालातून होते. परंतु प्रशासन लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद, शिफारसी, शेरे कचऱ्याच्या टोपलीत टाकून देते हेच या अहवालाची अंमलबजावणी न केल्यामुळे दिसून येते. सुलभ संदर्भासाठी वरील विषयांकित वार्षिक लेखा परीक्षण अहवालाची प्रत सोबत आपणास जोडून देत आहे. कृपया या लेखा परीक्षण अहवालाचे काळजीपुर्वक अवलोकन व्हावे. आर्थिक वर्ष सन २०१४-१५ व सन २०१५-१६, सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील वार्षिक लेखा परीक्षण अहवाल यामध्ये नगररचना विभागातील झालेल्या अनियमितता, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान नमूद केले आहे ते तात्काळ वसूल करण्यात यावे व अनियमितता करणाऱ्या नगररचना विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची खाते चौकशी सुरु करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच वरील कालावधीत अपूर्ण राहिलेली नगररचना विभागाचे लेखा परीक्षण संपूर्ण अभिलेखानुसार पूर्ण करुन घेण्यात यावे व महानगरपालिकेचे झालेले कोट्यावधी रुपयांचे आर्थिक नुकसान भरुन घ्यावे व हानी टाळावी. लेखापरिक्षन कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती : संबंधीत सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार प्रशासनाने तात्काळ कारवाई करुन लेखा परीक्षण अहवाल स्थायी समितीकडे लवकरात लवकर सादर करावा.

श्री.गजानन बारवाल : महापालिकेची चेक देण्याची पध्दत कशी आहे, वसुली किती होते, सध्या स्थिती काय आहे?

मुख्यलेखाधिकारी : आठ महिन्यामध्ये फक्त १७ टक्के वसुली झालेली आहे. शासनाचे जे पेमेंट आहे ते चेकद्वारे करतो. बाकी सर्व आरटीजीएस द्वारे करतो.

श्री.गजानन बारवाल : अठरा हजाराचा चेक देण्यात आले होते पण ते बाऊस झाले.

मुख्यलेखाधिकारी : दि.२२.१०.२०१९ ला चेक दिला होता. तो चेक बाऊस झालेला आहे.

श्री.गजानन बारवाल : ४५ दिवसापासुन सर्व ठेकेदार तिथे बसुन आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारचे सहकार्य मिळत नाही. सर्व कामे ठप्प झालेली आहे. ठेकेदार कुठलेही काम घेण्यास तयार नाही. मा.आयुक्त अजुन आलेले नाही. जो पर्यंत ठेकेदारांचे बिल दिले जात नाही तो पर्यंत कोणतेही कामे होऊ शकत नाही.

मा.सभापती : स.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रशासनाने वसुलीकडे लक्ष केंद्रीत केले पाहिजे. अधिकारी यांनी वसुली वाढवण्याचे प्रयत्न करावे. सर्व वार्ड अधिकारी यांनी नियमानुसार जी काही कार्यवाही करण्यात येईल ती करावी. अन्यथा कर वसुली व पाणी पट्‌टी वसुली या संदर्भात कार्यवाहीचे आदेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : जायकवाडीवरुन पाणी आणुन सुध्दा पाच दिवसाआड पाणी येत आहे. पाणी पाच दिवसावर केले त्याचा फायदा काय झाला?

वार्ड अभियंता(श्री.संधा) : सिडको आणि बाकीच्या वसाहतीला सात दिवसाआड पाणी पुरवठा होत होता. आता चार दिवसाआड पाणी पुरवठा चालु आहे. ५० मिनिटे पाणी देत असतो.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः सहा दिवसाआड पाणी पुरवठा झाल्यामुळे पाणी साठवून राहाते त्यामुळे डेंग्युचे प्रमाण वाढु शकते. तीन दिवसाआड पाणी पुरवठा झाला पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : पुर्वी ज्या पध्दतीने पाणी पुरवठा होत होता त्याच पध्दतीने पाणी देण्यात यावे.

मा.सभापती : पाणी पुरवठा विभागाने योग्य नियोजन करुन समान पाणी पुरवठ्या बरोबरच तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : स.सदस्य श्रीमती.वाडकर यांच्या वार्डातील कचरा प्रश्नी आणि ताळा लावण्याप्रकरणी पेपरमध्ये बातमी आली होती. मा.महापौरांच्या उपस्थितीत त्यांनी लॉक लावला. अधिकाऱ्यांनी लॉक तोडुन कचरा टाकला. नगरसेविका इतके सहकार्य करत असतात तरी सुध्दा त्यांच्या वार्डामध्ये कचरा आणुन टाकतात.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः एवढ्या दिवसापासुन रेडडी कंपनी ती जागा वापरतात. आता ती जागा पार्कींगसाठी देण्यात आलेली आहे. तिथे कचऱ्याचा खुप मोठा ढिग पडलेला आहे. तिथे लोकांचाच विरोध आहे.

मा.सभापती : याबाबत खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(महसुल) : सुचनेची दखल घेण्यात येईल, सर्व वार्ड अधिकारी आणि रेडीचे ठेकेदार, कर्मचाऱ्यांची मिटींग घेऊन घनकचरामध्ये प्रयत्न करु.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः आजच्या आज तिथे पार्कींग बंद केली पाहिजे.

उपआयुक्त(महसुल) : रमानगर मध्ये ग्रीनव्हेल्सचा प्रोब्लब आहे.

मा.सभापती : परिस्थिती खुप गंभीर आहे. डेंग्युचे चार पाच रुग्ण तिथे आढळलेले आहे.

उपआयुक्त(महसुल) : संबंधीतांना नोटीस देऊन खुलासा घेण्यात येईल.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः आजच्या आज रमानगर येथील पार्किंग बंद झाली पाहिजे. असे आदेश देण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल : श्रीमती शिल्पाराणी वाडकर आणि त्यांच्या वार्डातील नागरिकांनी गेल्या ३ वर्षापासून महानगरपालिकेला खुप सहकार्य केले आहे. त्यांच्या वार्डात पार्किंगसाठी जागा उपलब्ध करुन दिली व १०० टक्के टॅक्स सुद्धा पेड केला आहे पण तेथे डेंग्युचा आजार कचऱ्यामुळे पसरत आहे त्यामुळे सर्व नागरिक त्रस्त आहेत म्हणून नम्र विनंती आहे कि आपण आदेशित करावे लवकरात लवकर तेथील पार्किंग बंद करण्यात यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः यानंतर तेथे गाडया पार्किंग झाल्या व आमच्याकडून काही गाडयांची तोडफोड किंवा मारहाण झाली तर या सर्वांना महानगरपालिका सर्वस्वी जबाबदार राहील. आम्ही वार्डात जनजागृती करुन नागरिकांना ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करायला सांगितले पण कंपनीचे कर्मचारी कचरा एकत्रित करुन नेतात. त्याचे कारण कि त्यामुळे कचऱ्याचे

वजन वाढते व त्यात माती, विटा, फेब्रिज एकत्र करुन वजन वाढता येईल, यासाठी कोण जबाबदार आहे? या कंपनीवर नियंत्रण कोणाचे आहे?

मा.सभापती : संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : एल.ई.डी. लाईटस् प्रश्न अत्यंत महत्वाचा उपस्थित झाला आहे कारण दिवाळी सारख्या सणांच्या कालावधीत वीज कंपनीने जसे सहकार्य करायला हवे तसे बिलकूल करण्यात आले नाही. तक्रार केली असता पेमेंट न झाल्याने काम करता येणार नाही असे म्हणून प्रशासनाला वेठीस धरण्याचे काम करत आहे. त्यामुळे नम्र विनंती आहे कि प्रशासनाने त्वरित कारवाई करावी किंवा त्यांना यासाठी करण्यात यावे. अधिकाऱ्यांनी बोलावून सुद्धा एल.ई.डी कर्मचारी काम करायला येत नाही.

उपअभियंता(विद्युत) : दिवाळी सणा दरम्यान सर्व सन्मानीय सदस्यांची एल.ई.डी कंपनी सोबत संपर्क करण्याचा प्रयत्न केला व मी स्वतः त्यांचा ऑफिसमध्ये गेलो पण त्यांचे समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांना पत्र देखील देण्यात आले आहे. पुढील सभेत त्यांचा सविस्तर आढावा सादर करतो.

श्री.सचिन खैरे : अधिकाऱ्यांना ६ महिन्यांपासुन वार्डात व्हिजिट करण्यासाठी बोलवत आहे पण ते येत नाही. रस्त्यावर एल.इ.डीचे पोल पडलेत, लाईट फुटलेत नागरिकांना दुखापत झाली तरी ते काळजी घेत नाही. लाईट रिपेअर होत नाही व एल.ई.डीचे मेन्टेन्स होत नाही फोकस लाईट बंद आहे आणि जे जुने पोल आहे ते एल.ई.डी कंपनी कडून बदलून घेण्याचे कामही होत नाही आहे.

उपआयुक्त(महसूल) : विदयुत विभागाचा पूर्ण पदभार श्री.देशमुख डेप्युटी इंजिनिअर यांना दिला आहे पण ते सुट्टीवर आहेत. श्री. देशमुख एल.ई.डी कंपनीसोबत नियोजन करुन विदयुत विभागात सुधारणा करण्यासाठी अहवाल सादर करावा

श्री.गजानन बारवाल : शहरात रस्त्यांची सर्व प्रकारची कामे बंद आहेत व मा. महापौरांनी वेळोवेळी संचिका देऊनही कामे होत नाही याची माहिती देण्यात यावी. व पॅचवर्कचे कामे कसे केले आहे याची सुद्धा माहिती देण्यात यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः नवीन रस्त्याचे काम करायला पैसे नसतील पण पॅचवर्कचे काम तरी व्यवस्थितरित्या झाले पाहिजेत.

श्री.सचिन खैरे : महानगरपालिका ते बेगमपुरा, बिबी का मकबरा या रस्त्यावरील पॅचवर्कचे काम झाले आहे की नाही याची माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता(पा.पु) : पॅचवर्कच्या कामासंबंधात जे अंदाजपत्रक आहेत त्यात काहीची मंजुरी मिळाली आहे व काहींचे टेंडर यांना मंजुरी मिळाल्यावर आम्ही सर्व कामे चालू करणार आहोत. आचार संहितेमुळे काही रस्त्याचे काम थांबले होते पण आता रस्त्यांचे डांबरीकरण लवकरात लवकर करणार आहोत.

श्री.गजानन बारवाल : मुंकंदवाडी स्त्यांचे काम चालू आहे पण पेमेंट न झाल्यामुळे काम होत नाही. व पद्मपुऱ्यातील मेन रस्त्याचे काम ६ महिन्यापासून अर्धवट झालेले आहे ठेकेदार ते काम करायला तयार नाहीत.

कार्य.अभियंता(पा.पु) :त्या रस्त्यांचे लेव्हलची अडचणी येत होत्या. तेथील नागरिकांनी ऑबजेक्शन घेतले होते म्हणून काम थांबले होते पण आता प्रॅब्लेम सॉल झालेला आहे लवकरात लवकर ते काम सुरु करण्यात येईल व पद्मपुऱ्यातील मेन रस्त्याचे कामाची मी स्वतः जाऊन पाहणी करतो.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः टेंडर काढले जरी पण ठेकेदार काम घेत नाही. आपल्याला चांगल्या क्वालिटीचे काम त्यांच्याकडून करुन घ्यावे लागेल

श्री.नासेर सिद्दिकी : आयुक्त सभेत निर्णय देण्यासाठी उपस्थित राहत नाही. टेंडर निघूनही ठेकेदार अडकले जातात कारण कोणतीच एजन्सी मागचे पेमेंट मिळाल्याशिवाय नवीन काम घेत नाही. जर या कामाचे गांभीर्य घेत असेल तर मिटींग घ्यावी.

श्री.सचिन खैरे : बिबी का मकबरा ते महानगरपालिका या रस्त्याचे २ महिन्यापूर्वी पॅचवर्क झाले आहे. पण सद्यस्थितीत तेथे सिमेंट व क्रॉक्रींटचे पॅचवर्क काम केल्यानंतरही दीड ते दोन फुटाचे गड्डे आहेत. अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आलेले आहे सुट्टयामुळे गर्दी आहे पण गड्डयामुळे मनपाचे नाव खराब होत आहे. बिबी का मकबरा येथे अधिकाऱ्यांनी पाहणी करावी तेथे अपघाताचे प्रमाण वाढत आहे.

कार्य.अभियंता(पा.पु) : क्रॉक्रीटने काही रस्ते भरण्यात आले व नुकत्याच झालेल्या पावसाने त्याच्या बाजूला नवीन खड्डे तयार झालेले आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः मागच्या सभेत कुत्र्यांच्या कोंडवाडा बांधण्याचा विषय घेतला होता. त्याबद्दल माहिती दयावी.

कार्य.अभियंता(पशुसं.) : मागच्या वेळेस पाहणी करण्यात आली होती आणि २ ऑपरेशन थिएटर बांधायचे होते त्याचा प्रस्ताव इंजिनिअर वामन कांबळे यांच्याकडे दिला आहे व ऑपरेशन झाल्यानंतर कुत्रे ठेवण्यासाठी जागा कमी पडत आहे. रोज २५ कुत्र्यांचे ऑपरेशन करु शकतो एवढी जागा आणि ऑपरेशन थिएटर आपल्याजवळ उपलब्ध आहे. पण कुत्र्यांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे दररोज किमान ५० कुत्र्यांचे ऑपरेशन झाले पाहिजेत.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः पिसाळलेले कुत्र्यांची संख्या वाढल्यामुळे नागरिकांचे जीव गेलेले आहे.

संचालक (प्रा.सं) : पिसाळलेले व खरुज झालेले कुत्रे आहेत त्या प्रत्येक कुत्र्याचे स्वतंत्र पेन्स बांधण्याचे काम चालू आहे आणि जे कुत्रे उपचार करुनही दुरुस्त होत नसेल तर त्यांना इंजेक्शन देऊन मारावे लागते ते काम हाती घेण्यात आलेले आहे. मात्र २ ऑपरेशन थिएटर चे काम व ऑपरेशन झालेल्या कुत्र्यांना ठेवण्यासाठी जागेचे काम प्रलंबित आहे ते झाल्याशिवाय कुत्र्यांच्या ऑपरेशनची संख्या वाढता येणार नाही. ५० पेक्षा जास्त ऑपरेशन केल्याशिवाय कुत्र्यांची संख्या नियंत्रणात येणार नाही. त्या दृष्टीने बांधकाम विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांशी समन्वय साधून काम सुरु करु. ३ महिन्यापासून अॅपलीकेशन दिलेले आहे त्याचा पाठपुरावा घेत आहे.

मा.सभापती : बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

उपअभियंता(बोध) : कुत्र्यांच्या तत्कालीन कामातील ८० टक्के काम पूर्ण झाले आहे व २० टक्के काम बाकी आहे. ऑपरेशन थिएटरसाठी ज्या जागेची मागणी अधिकाऱ्यांनी केली आहे ती फायनल करायची राहिली आहे. कारण सध्या तेथे कचऱ्याचे पीट्स आहे ते डेमॉलिश करुन ऑपरेशन केलेल्या कुत्र्यांना ठेवण्याची जागाबाबत याची मागणी आहे ती जागा फायनल झाल्यानंतरच काम सुरु करता येईल

संचालक(प्रा.सं) : आयुक्तांनी त्या जागेला भेट दिली होती त्या जागेसमोर जे रिकामे पीट्स आहेत त्यातील कचरा काढाण्याचे आदेश वार्ड अधिकाऱ्यांना दिले आहेत त्यासाठी मिटिंग घेतली आहे व लेखी आदेश दिले आहेत व त्याची जबाबदारी वार्ड अधिकारी शहर अभियंता व आमच्यावर दिलेली आहे. व वारंवार याची माहिती कळवत आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकरः सर्व अधिकाऱ्यांचे फॉलोअप घेऊन हे काम लवकरात लवकर पूर्ण करा अशी आमची विनंती आहे.

श्री.सचिन खैरे : कुत्र्यांचे ऑपरेशन झाल्यावर बिबी का मकबरा, पहाडसिंगपूरा या ठिकाणी सोडले जातात त्यावर काय कारवाई केली जाते. वर्तमानपत्रात याबद्दल सतत बातमी येते कि अशा ठिकाणी कुत्रे जास्त प्रमाणात सोडले जातात असे का होत असते?

संचालक (प्रा.सं.) : अॅनिमल वेलफेअर बोर्डाचे जे नियम आहेत त्यामध्ये ज्या ठिकाणाच्या कुत्र्यांच्या तक्रारी आहेत त्या कुत्र्यांना पकडून आणणे त्यांचे ऑपरेशन करणे त्यांना लस देणे व त्याच ठिकाणी त्यांना पुन्हा सोडणे.

श्री सचिन खैरे : सिटीमधून कुत्रे पकडून ज्या ठिकाणी लोकवस्ती जास्त आहेत त्या ठिकाणी सोडले जातात असे प्रकार जास्त प्रमाणात होत आहे यास कोण जबाबदार आहे.

उपआयुक्त(महसुल) : श्री.नाईकवाडे व श्री.कोल्हे यांनी स्वतः कुत्र्यांचे ऑपरेशन थिएटर बांधणे व कुत्र्यांच्या कोडंवाडा करण्याचा ठिकाणी येत्या आठवडयात पाहणी करावी व योग्य ते नियोजन करुन पुढील स्थायी समितीच्या बैठकीत अहवाल सादर करावा.

श्रीमती सीमा चक्रनारायणः मागच्या ३ ते ४ वर्षापासून जनरल बॉडीच्या सभेत मोरेश्वर सोसायटीतील नाल्यावरील अतिक्रमणाबद्दल बोलत आहे. वार्ड अभियंता व संबंधीत अधिकाऱ्यांशी संपर्क केले. त्या नाल्यावर अतिक्रमण करुन त्या नाल्यावर स्लॅप टाकण्याचे काम चालू आहे व पून्हा दूसऱ्या अतिक्रमणाचे चालू आहे त्यांना त्या संबंधात नोटीसही देण्यात आली त्याची मुदत संपल्यावरही त्यावर कोणत्या प्रकारची कारवाई होत नाही.

मा.सभापती : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा दयावा.

उपआयुक्त(मालमत्ता) : अतिक्रमणासंदर्भात मालकी हक्काचे पेपर सादर करण्यासाठी संबंधीतांना नोटीस दिली आहे त्याची मुदत संपल्यावर महानगरपालिका अधिनियम कलम २६० अनुसार १५ दिवसांची मुदत म्हणून नोटीस दयावी लागते त्यानंतर ते डिमॉलिश करता येते व त्याचा फॉलोअप घेतला १ ते २ दिवसात अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती सीमा चक्रनारायणः मोरेश्वर सोसायटीतील नाल्यावरील अतिक्रमण लवकर काढणे खुप महत्त्वाचे आहे कारण त्या नाल्याचे पाणी पुंडलिकनगर येथुन वाहत येतो मागील पावसाळयात शाळेतील एक मुलगा त्या नाल्यात पडला होता २ मुलांनी त्याला वाचवल्याची घटना घडली आहे. लोकांनी नाल्यावर स्लॅप टाकल्यामुळे पाणी व्यवस्थित वाहत नाही त्यामुळे अतिक्रमण काढणे अतिशय महत्त्वाचे आहे.

मा.सभापती : सन्मानीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी.

**विषय क्र. ४४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे १०० व ५६ दलली प्रतिदिन क्षमतेचे दोन जलशुध्दीकरण केंद्र असुन या दोन्ही केंद्रातुन दररोज १५० दलली पाण्यावर प्रकिया केली जाते. जलशुध्दीकरण प्रक्रियेत विविध टप्प्यांवर तुरटी ग्रेड-१, ब्लिचींग पावडर ग्रेड-१ व क्लोरीनचा वापर केला जातो. पाणी गाळण प्रक्रियेनंतर पाण्याचे निर्जंतुकिकरण करून पाणी पिण्या योग्य करण्यासाठी क्लोरीनचा वापर प्रि-क्लोरीनेशन व पोस्ट क्लोरीनेशनच्या स्वरूपात केला जातो. प्रि-क्लोरीनेशन करीता १ पीपी एम व पोस्ट क्लोरीनेशन करीता ३ पीपी एम इतक्या मात्रेची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभ येथे देखील ०.५ पीपी एम इतकी क्लोरीनची मात्रा रि-क्लोरीनेशनच्या स्वरूपात दिली जाते. दैनंदिन प्रक्रिया करण्यात येणारे पाणी परिमाण व आवश्यक मात्रा लक्षात घेता जलशुध्दीकरण केंद्राची वार्षिक मागणी २४२ मे. टन इतकी आहे.

सदरील पुरवठ्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१९-२० च्या दरसुचीतील साहित्य पुरवठ्यातील दरानुसार दर पृथःकरण करून तयार करण्यात आले आहे. कामाची अंदाजपत्रकीय रक्कम ४२,८०,३८६/- इतकी असून सदरील पुरवठ्याचा खर्च पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आला आहे. करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्रासाठी वार्षिक क्लोरीन पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.४२,८०,३८६/- मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : विषय पत्रिकेमधील विषय क्रमांक ४४ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथे केल्या जाणाऱ्या जलशुद्धीकरण केंद्राची सद्यस्थिती काय आहे याची सविस्तर माहिती सदस्यांना देण्यात यावी. तसेच तेथे केल्या जाणाऱ्या प्रक्रियेत तुरटी ग्रेड-१, ब्लिचींग पावडर ग्रेड-१ व क्लोरीनचा वापर याबद्दल माहिती दयावी

कार्य.अभियंता(पा.पु) : फारोळा येथे पाणी पुरवठयासाठी तुरटी ग्रेड-१, ब्लिचींग पावडर व क्लोरीनचा वापर करुन सप्लाय चालू आहे त्याचा सद्यस्थितीत स्टॉक आहे आणि व्यवस्थितरित्या पुरवठा देखील चालू आहे पण हा स्टॉक संपल्यानंतर पुढच्या कालावधीसाठी लागणाऱ्या तरतुदीसाठी हे अंदाजपत्रक मंजुरीसाठी दिले आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक ४४ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत फारोळा येथील दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रात दररोज होणाऱ्या १५० दलली पाण्यावर प्रकिया करणेसाठी लागणाऱ्या वार्षिक क्लोरीन खरेदी करण्याकरीता तयार करण्यांत आलेल्या र.रू. ४२,८०,३८६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१९/३३८. दि.०५/०३/२०१९ अन्वये मालमत्ता/पाणीपट्टी कर वसूली व घनकचरा व्यवस्थापन या विवक्षित कामासाठी श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांची सेवा करार पध्दतीने प्रथमतः ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मार्यादा रु.४०,०००/-(रूपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील, या अटीवर नियुक्ती देण्यात आलेली आहे.

तथापि सदर मुदत ही दि.०४/०९/२०१९ रोजी संपली असून मालमत्ता/पाणीपट्टी कर वसूली व घनकचरा व्यवस्थापन या विवक्षित कामासाठी त्यांची आवश्यकता असल्याबाबत घनकचरा विभाग व कर निर्धारण व संकलन विभागाने अभिप्राय दिला आहे.

करिता श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०७/०९/२०१९ ते दि.०६/०३/२०२० या कालावधीसाठी दि.०५/०३/२०१९ च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांना ६ महिन्यासाठी नियुक्ती केली होती ते सध्या कार्यालयीन काम करत आहे त्याबद्दल माहिती सभागृहास दयावी.

आस्थापना अधिकारी-१ : श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांची मालमत्ता/पाणीपट्टी कर वसूली व घनकचरा व्यवस्थापन या कामासाठी ६ महिन्यांसाठी नियुक्ती केली होती व घनकचरा विभाग व कर निर्धारण व संकलन विभाग प्रमुखांनी त्यांचे काम समाधानकारक असुन पुढील ६ महिन्यासाठी मुदत वाढ देण्यासाठी शिफारस केली आहे. त्यांचा कार्यकाळ ४.०९.१९ रोजी संपला आहे. श्री.झनझन यांना पुढील कामाचे कन्टयुनेशन दिले आहे.

श्री.गजानन बारवाल : श्री. झनझन यांना कामाचे कन्टयुनेशन दिले आहे व ते कार्यालयाचे काम करत आहे म्हणून मुदतवाढ देण्यास हरकत नाही अशी विनंती आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक ४५ मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१९/३३८. दि.०५/०३/२०१९ अन्वये मालमत्ता/पाणीपट्टी कर वसूली व घनकचरा व्यवस्थापन या विवक्षित कामासाठी करार पध्दतीने घेण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकारी श्री.शिवाजी बाबुराव झनझन यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दि.०७/०९/२०१९ ते दि.०६/०३/२०२० या कालावधीसाठी दि.०५/०३/२०१९ च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६ :**

श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/१९९९/१९४० दि.७/५/१९९९ अन्वये कार्यव्ययी आस्थापना (वर्क चार्ज इस्टॅब्लिशमेंट) वर दुय्यम आवेक्षक म्हणून वेतनश्रेणी रू.१४००-२३०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली होती.

श्री.काझी जावेद अहमद सिद्यीकी यांना दुय्यम आवेक्षक या पदावर दि.७/५/१९९९ रोजी कार्यकारी अभियंता (स्लम) यांचेकडे रुजू करुन घेण्यात आले होते. संबंधितांची शैक्षणिक अर्हता ही Diploma in Civil Engineering अशी होती.

कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०००/१४३. दि.२७/३/२००० नुसार संबंधितास दि.११/८/१९९९ ते दि.३१/३/२००० या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. तसेच कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०००/१४८. दि.२७/३/२००० अन्वये संबंधितास दि.३१/३/२००० रोजी मध्यान्हानंतर कार्यमुक्त करण्यात आले.

याबाबत संबंधिताने मा.कामगार न्यायालय,औरंगाबाद येथे IDA १८/२००६ अन्वये याचिका दाखल केली होती. त्यानुषंगाने मा.कामगार न्यायालयाने दि.२६/१२/२०१३ रोजी निर्णय देवून संबंधितास दुय्यम आवेक्षक या पदावर ०२ महिन्यात नियुक्ती देणेबाबत आदेश दिले होते. तथापि मा.कामगार न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.८७३१/२०१५ अन्वये अपिल दाखल केले असता, मा.उच्च न्यायालयाने सदरचे अपिल दि.१०/४/२०१७ रोजी खारीज करुन मा.कामगार न्यायालयाने दिलेले आदेश कायम केले आहे.

त्यामुळे दि.८/११/२०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा अवमान होवू नये म्हणून वयाची अट शिथिल करुन मागील कोणतीही आर्थिक थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही या अटीवर तुर्त श्री.काझी जावेद अहमद सिद्यीकी यांची कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१७/१४१०. दि.८/११/२०१७ अन्वये दुय्यम आवेक्षक या पदावर खुला प्रवर्गात वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० व नियमानुसार मिळणाऱ्या भत्यावर प्रथम ०६ महिन्याकरीता नियुक्ती करुन सदर नियुक्ती नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात येईल व मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आदेश काढण्यात आले आहेत. मा.कामगार न्यायालयाच्या निर्णयानुसार दि.८/११/२०१७ पासून दुय्यम आवेक्षक या पदावर प्रथम ०६ महिन्याकरीता नियुक्ती देण्यात आलेली आहे. सदर कालावधी हा दि.७/५/२०१८ रोजी संपुष्टात आल्याने दि.१५/७/२०१९ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.०८ नुसार संबंधितास दि.७/५/२०१८ पासून पुढील ०६ महिन्यासाठी तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत पारीत करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१९/१०७३. दि.३१/७/२०१९ अन्वये संबंधीतास तांत्रिक खंड देवून दि.७/५/२०१८ पासून ०६ महिन्यासाठी तात्पुरती नियुक्ती देण्यांत आलेली आहे.

करिता श्री.काझी जावेद अहमद सिद्यीकी, दुय्यम आवेक्षक या पदावर वेतनश्रणी रु.५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० व नियमानुसार मिळणाऱ्या भत्यावर तांत्रिक खंड देवून दि.०९/११/२०१८ ते दि.१०/०५/२०१९ व दि.१५/०५/२०१९ ते दि.१४/११/२०१९ पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) च्या परंतूकान्वये तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्रीमती सायरा बानो : श्री.सजंय कोबंडे, श्री.अमोल कुलकर्णी व श्री.काझी जावेद यांना मा.हायकोर्टने सेवेत कायम करण्याचे आदेश दिले होते.महानगरपालिकेने श्री.संजय कोबंडे व श्री.अमोल कुलकर्णी यांना परमनन्ट केले परंतु श्री.काझी जावेद यांना केले नाही व पुढील स्थायी समितीत यांवर चर्चा करुन त्यांच्या कायम सेवेच्या ऑर्डरसाठी मंजुरी घेण्यात येईल असे आश्वासन दिले परंतु अजुनही याची दखल का घेण्यात आली नाही याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : जो प्रस्ताव आला आहे कि श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी यांना मा.कोर्टाने सेवेत कायम करण्याचे आदेश दिले आहे हे सत्य आहे कि नाही याचा खुलासा करावा.

मा.सभापती : संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

आस्थापना अधिकारी : श्री. काझी जावेद अहमद सिद्दीकी हे महानगरपालिकेत २००० साली कंत्राटी तत्वावर कार्यरत होते. नंतर मा.कोर्टने निर्णय दिल्याप्रमाणे त्यांची संचिका प्रस्तावित होती. मा.कोर्टाचा आदेश त्यांना महापालिकेच्या सेवेत घ्यावा असा आहे परंतु निवड समितीने बैठक घेतली व त्यांनी जो निर्णय घेतला कि ते ज्या स्थितीत कार्यरत होते त्या स्थितीत त्यांना सेवेत घेण्याचे आदेश आयुक्तांनी दिला आहे.

श्री.गजानन बारवाल : श्री. झनझन यांना १८ महिन्यांचे वेतन दिले आहे का?

आस्थापना अधिकारी-१ : ठराव मंजूर नसल्याने त्यांना वेतन दिले नाही.

श्री.गजानन बारवाल : अधिकाऱ्यांकडून काम करुन घेतलेले आहे व त्यांना त्यांचे पैसे सुद्धा दिलेले नाही. जर मा.हायकोर्टाने तिघांना परमनन्ट करण्याचे आदेश आहेत तर दोघांना रुजु करुन यांना मागे का ठेवले आहे. काय अडचण आहे?

आस्थापना अधिकारी : श्री.कोबंडे व श्री कुलकर्णी यांचे २००७-०८ चे न्यायालयीन आदेश होते व आयुक्त श्री.बंड साहेबांच्या कालावधीत २००९च्या दरम्यान तो निर्णय घेण्यात आलेला आहे. तो जुना विषय आहे.

श्रीमती सायरा बानो : कोर्टाचे आदेश वाचण्याची अनुमती दयावी.

(In my perceptions, the Corporation is not justified in incorporating such condition in his order of appointment, as the Standing Committee cannot sit in appeal over the decision of the Labour Court, especially when the said decision has been endorsed by the Honble High Court by dismissing W.P.No.8731 of 2015 dated 10.4.2017.

Corporation has no option than to continue Mr.kazi Ahmed Siddiqui in service as Overseas in terms of the order of appointment dated 8.11.2017. Incorporation of a clause in his appointment order of placing the proposal before the Standing committee is not justified.)

जेव्हा ऑर्डर काढण्यात आले तेव्हा हायकोर्टाने आदेश दिले होते कि श्री.काझी यांना रिस्टेट करा. पण २ जणांना केले तर तिसऱ्या कर्मचारी यांना का करण्यात आले नाही.

श्री.गजानन बारवाल : हायकोर्ट आणि कामगार न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले आहे की, श्री. काझी जावेद यांना रिस्टेट करावे पण करण्यात आले नाही. काय अडचण आहे स्पष्ट करावे.

विधी सल्लागार : श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी यांच्या बाबतीत कामगार न्यायालयाने १८.४.२००६ व २६.१२.२०१३ ला निर्णय दिला व त्यांनी पून्हा हायकोर्टात अपील केले १०.०४.२०१७ रोजी त्यांनी कामगार न्यायालयाचे निर्णय कायम ठेवले व त्या आदेशात त्यांच्या कंटयुनिटीबाबत उल्लेख नसल्यामुळे निवड समितीने त्यांना ते जसे आहेत तसे वेतनश्रेणीवर नेमण्याबाबत प्रस्तावित केले आहे. माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला कि श्री कोबंडे व श्री कुलकर्णी यांना कामावर कसे कायम करुन घेण्यात आले तर त्यांच्याबाबतीत १० वर्षापूर्वी जो जजमेंट आला होता त्याची प्रत पुढील स्थायी समितीच्या बैठकित सर्व सन्माननीय सदस्यांना अवलोकनार्थ देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : श्री.शिवाजी झनझन यांच्या नियुक्ती बाबत कोर्टाने काय निर्णय दिलेला आहे?

विधी सल्लागार : श्री.शिवाजी झनझन यांच्या नियुक्ती बाबत कामगार न्यायालयाबाबत जो निर्णय झाला होता तो उच्च न्यायालयाने कायम केला. कोर्टाने महानगरपालिकेत किती व्हॅक्नट पोस्ट आहेत तेव्हा आयुक्तांनी अंदाजे रिक्त पदावर अधिकाऱ्यांना नियुक्त करुन घेण्याबाबत सांगितले

श्रीमती सायरा बानो : मा.हायकोर्ट व कामगार न्यायालयाचे लेखी आदेशावरुन श्री.झनझन यांना नियुक्त करुन घ्यावे अशी नम्र विनंती आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक ४६ मंजुर करण्यात येत आहे. प्रशासनाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. ऐनवेळीचे काही विषय आलेले आहेत त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.काझी जावेद अहमद सिद्दीकी, यांना 'दुय्यम आवेक्षक' या पदावर वेतनश्रेणी रू.५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० व नियमानुसार मिळणाऱ्या भत्त्यावर तांत्रिक खंड देवून

दि.०९/११/२०१८ ते दि.१०/०५/२०१९ व दि.१५/०५/२०१९ ते दि.१४/११/२०१९ पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) च्या परंतूकान्वये तात्पुरती नियुक्ती देण्यास तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीतास कायम स्वरूपी करणेकरीता नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.१२ न्यु पहाडसिंगपुरा, देवनंदीनगर, सतपालनगर येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे सन २०१८-१९ च्या एस.एस.आर. दरसुचीनुसार रक्कम रू.३९,९९,५१९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च नवीन कॉंक्रीट रस्ते अंतर्गत सन २०१८-१९ या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.३९,९९,५१९/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.१२ न्यु पहाडसिंगपुरा, देवनंदीनगर, सतपालनगर येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३९,९९,५१९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८ :**

विषय : वार्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत पदमपाणी कॉलनी येथे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराची म्हणजेच निविदा रक्कम रू.३१,२१,५७३/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि. १६/०९/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरुप | कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ३४,९६,१६२/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ३१,२१,५७३/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे व दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीद्वारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १३ सप्टेंबर २०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १६ सप्टेंबर २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.मिताली कन्स्ट्रक्शन | ३१,२१,५७३/- | अंदाजपत्रकीय दराची |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | नागरी दलित वस्ती सुधार योजना<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.१५/०७/२०१९ विषय क्र.०५ |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.३१,२१,५७३/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत पदमपाणी कॉलनी येथे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.३१,२१,५७३/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९ :**

विषय : वार्ड क्र.१०३, अंतर्गत शाहुनगर येथील हॉटेल तंदुर ते मनजीत निवासकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०० टक्के जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०० टक्के जास्त दराने म्हणजेच निविदा र.रू.२८,१८,९३५/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि. २७/१२/२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरुप | कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | २८,९६,५२१/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | २५,८६,१७९/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे व दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीद्वारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १५ सप्टेंबर २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २७ डिसेंबर २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.मिताली कन्स्ट्रक्शन | २५,८६,१७९/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०० टक्के जास्त दराने ऐवजी ९.०० टक्के जास्त दराने मान्यतेस्तव. |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे ? | सदर कामासाठी कंत्राटदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०० टक्के जास्त दराने निविदा सादर केली आहे. निविदा समितीने सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०० टक्के जास्त दराने करणेस मान्यता दिली असून कंत्राटदाराने ९.०० टक्के जास्त दराने करणेस लेखी संमती दिली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय?<br>असल्यास कारणे नमुद करावीत. | होय<br>नाही<br>--- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामे<br><br>होय. |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.०२/०७/२०१८ विषय क्र.०८ |
| तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०० टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.२८,१८,९३५/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०३, अंतर्गत शाहुनगर येथील हॉटेल तंदुर ते मनजीत निवासकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.मिताली कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०० टक्के जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०० टक्के जास्त दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.२८,१८,९३५/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चाः-

श्री.गजानन बारवालःस्थायी समितीकडे अनेक विकास कामाच्या संचिका प्रलंबीत आहे व संबंधीत ठेककेदार काम करण्यास प्रतिसाद देत नाही. त्यामध्ये (१) वॉर्ड क्र.५१ विघ्नहर्ता गणेश मंदिर ते झाशी राणी चौक पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रू.२९,०५,५१९/- निविदा, (२) वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुराकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरणे करणे. (गंगाबावडी पासून) र.रू.३३,३३,२२५/- निविदा, (३) वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा येथील संभाजी चौक ते स्मशानभुमीपर्यंत रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे. र.रू.७४,९९,९८३/- निविदा, (४) वॉर्ड क्र.१० रोजाबाग येथील ताज ट्रेडर्स ते साहेब किराणा पर्यंत रस्त्याचे ट्रिमिक्स कॉंक्रीटीकरण करणे व रोडसाईड पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रू.३७,१५,६४१/-निविदा, (५) वॉर्ड क्र.१० रोजाबाग, सिध्दार्थनगर मधील वेगवेगळ्या ठिकाणाची गटार बांधणे व दुरूस्ती करणे. र.रू.२८,५५,९५८/- निविदा, (६) वॉर्ड क्र.१०१ अंतर्गत एकनाथनगर येथील खुली जागा विकसीत करणे. र.रू.२७,४७,५८१/- निविदा, (७) सिडको बसस्थानक ते हर्सुल टी-पॉईट या रस्त्यावरील ग्रीन बेल्टला कॉंक्रीट पोलवर चॅनलिंग करून सुरक्षित करणे. र.रू.५७,०१,५४५/- निविदा, (८) वॉर्ड क्र.३८ एमआयडीसी चिकलठाणा सिडको एन-१ सेक्टर-ए येथील मुख्य रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. र.रू.२९,२७,८०२/- निविदा, (९) वॉर्ड क्र.०८, सुरेवाडी अंतर्गत गल्ली क्र.२ व ३ व इतर गल्ल्यामध्ये रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. र.रू.३२,६४,५३०/- निविदा, (१०) वॉर्ड क्र.८० अंतर्गत विविध रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे र.रू.२४,३०,६०४.२८/- निविदा, (११) वॉर्ड क्र.८० अंतर्गत विविध रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. र.रू.४७,५८,५२०/- निविदा, (१२) वॉर्ड क्र.६५ शारदा अपार्टमेंट बसैय्येनगर सुराणानगर अंतर्गत डांबरीकरण करणे. र.रू.३९,६०,६९१/-निविदा, (१३) औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात विद्युतीकरण अग्नी सचेतक

व्यवस्था डिझेल जनरेटर, वॉटर कुलर व्यवस्था स्थापीत करणे. र.रू.२५,१०,६८४/- निविदा, (१४) वॉर्ड क्र.०९ अंतर्गत रविनगर मध्ये विविध सिमेंट काँक्रेट रस्ता तयार करणे. र.रु.३१,६८,०००/- (१५) वॉर्ड क्र.०९ अंतर्गत येथील शरद हॉटेल मागे विविध ठिकाणच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रेटींग करणे.र.रु.४३,९०,०००/- असे एकुण १५ कामे आहे ही कामे ठेकेदार करण्यास तयार नाही. त्यामुळे अशा विकास कामाच्या फेर निविदा करून तातडीने ही कामे हाती घेण्यात यावी. अशा प्रशासनाला सुचना करण्यात याव्यात.

मा.सभापती :स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांनी ज्या कामाच्या संदर्भात फेर निविदा काढण्या बाबत सुचना केली सदर कामाची आवश्यकता आहे किंवा नाही तसेच मनपाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन त्यानुसार प्रशासनाने सदर कामाच्या फेर निविदा काढून तातडीने कामे हाती घेण्यात यावी. अशा सुचना या समितीच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद